प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम सन २०१७ साठी राज्य शासनाच्या हिश्याची पिक विमा हप्ता अनुदानापोटी रु.४०४,४७,३३,३७८ इतकी रक्कम विमा कंपनीस वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांकः प्रपिवियो-२०१७/प्र.क्र.२१८/११ अे,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: ०९ मार्च, २०१८

वाचा -

१) शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थसंकल्प-३, दि.१८.०४.२०१७
२) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. प्रपिवियो-२०१७/प्र.क्र.१/११- अे, दि.२०.६.२०१७
३) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. प्रपिवियो-२०१७/प्र.क्र.१/११- अे, दि.२३.६.२०१७
४) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. सांव/८.वि.ह.अनु./ २०१७/५९५, दि..०९.११.२०१७
५) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. सां/८.वि.ह.अनु./ ६१८/ २०१७, दि. २१. ११.२०१७
६) शासन निर्णय कृषि व पदुम विभाग क्र. प्रपिवियो-२०१७/प्र.क्र.२१८/११-अे, दि.२७.११.२०१७
७) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. सां/८.वि.ह.अनु./१५२/ २०१८, दि. २८.०२.२०१८

प्रस्तावना :-

प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०१७ मध्ये राज्यात भारतीय कृषि विमा कंपनी, नॅशनल इंशुरन्स कंपनी, युनायटेड इंडिया जनरल इंशुरन्स कंपनी, रिलायन्स जनरल इंशुरन्स कंपनी व ओरिएन्टल जनरल इंशुरन्स कंपनी या ५ विमा कंपनीमार्फत राबविण्यात येत आहे. भारतीय कृषि विमा कंपनी ही राज्यात विमा कंपन्यांची समन्वयक कंपनी आहे. प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप हंगाम २०१७ अंतर्गत पिक विमा हप्ता अनुदानापोटी राज्य शासनास देय होत असलेली रु. ११०१,३९,३३,८१८ /- इतकी रक्कम विमा कंपन्यांना वितरीत करण्यात आलेली होती. आता कृषि आयुक्तालयाने संदर्भ क्र. ७ अन्वये प्रस्तुत योजना राज्यात राबविणाऱ्या सर्व विमा कंपन्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य हिश्याची विमा हप्त्याची देय असलेली रु.४०४,४७,३३,३७८ इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे. त्याअनुषंगाने विमा कंपन्याना उपलब्ध करुन देण्यासाठी रु.४०४,४७,३३,३७८ इतकी रक्कम कृषि आयुक्तालयाला वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

प्रधानमंत्री पिक विमा योजना सन २०१७-१८ साठी रु.१६५३.८० कोटी इतकी रक्कम अर्थसंकल्पित करण्यात आलेली असून सदर रु.१६५३.८० कोटी इतक्या रकमेपैकी दि.२७.११.२०१७ च्या शासन निर्णयान्वये यापूर्वीच रु. ११०१,३९,३३,८१८ /- इतकी रक्कम वितरीत करण्यात आलेली आहे. आता विमा कंपन्यांनी सादर केलेली मागणी आणि कृषि आयुक्तालयाची शिफारस या बाबींचा विचार करता विमा कंपन्यांना त्यांनी मागणी केलेल्या एकुण रु.४०४,४७,३३,३७८ इतकी रक्कम राज्य शासनास देय होत असल्याने पिक विमा हप्ता अनुदानाच्या राज्य हिश्याची रु.४०४,४७,३३,३७८ इतकी रक्कम विमा कंपन्यांना उपलब्ध करुन देण्यासाठी कृषि आयुक्तालयाला पुढीलप्रमाणे बीडीएस प्रणालीव्दारे वितरीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे :-

अ. क्र.	विमा कंपनी	पिक विमा हप्ता राज्य हिस्सा अनुदान मागणी (रक्कम रु.)
१	भारतीय कृषि विमा कंपनी	१५१,२०,८७,७५८
२	नॅशनल इंशुरन्स कंपनी लि.	७६,२४,९२,४६३
३	युनायटेड इंडिया जनरल इंशुरन्स कंपनी	४९,२९,८३,३८८
४	रिलायन्स जनरल इंशुरन्स कंपनी	४८,५२,४८,५१७
५	ओरिएन्टल जनरल इंशुरन्स कंपनी	७९,१९,२१,२५२
एकुण		**४०४,४७,३३,३७८**

२. प्रस्तुत बाबींवर होणारा खर्च खालील लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ करिता मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा :-

मागणी क्र. डी -३
२४०१ - पीक संवर्धन, ३३ - अर्थसहाय्य
११०, पीक विमा (००) (०८) प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत विमा हप्त्यासाठी अर्थसहाय्य
राज्य हिस्सा (२४०१ A ६६४) योजनेतर

३. प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०१७ अंतर्गत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांची माहिती विमा कंपन्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशीत करणेबाबत केंद्र शासनाने सूचित केलेले आहे. त्यानुसार विमा कंपनीने सादर केलेल्या देयकासोबत सदरची माहिती संकेतस्थळावर भरली असल्याचे प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने ज्या ज्या विमा कंपन्यांनी अद्याप प्रधानमंत्री पिक विमा योजना खरीप २०१७ अंतर्गत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांची माहिती विमा कंपन्यांच्या संकेतस्थळावर प्रकाशीत केल्याचे प्रमाणपत्र दिलेले नाही त्यांना सदर प्रमाणपत्राची पूर्तता केल्यानंतर व सर्व लाभार्थ्यांची माहिती संबंधित कंपन्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याची खात्री (आयुक्त) कृषि यांनी न चुकता करावी व विमा कंपन्यांकडून मागणी करण्यात आलेल्या अनुदानाची छाननी करुन ते उपलब्ध करुन देण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

तसेच सर्व विमा कंपन्यांकडून लाभार्थी शेतकऱ्यांसंदर्भात विमा कंपन्यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध केलेल्या सविस्तर माहितीची प्रत स्वतंत्रपणे आयुक्त (कृषि) यांनी प्राप्त करावी व ती कृषि आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर देखील कायमस्वरुपी माहितीस्तव प्रकाशीत करुन जतन करावी.

४. प्रस्तुत प्रयोजनार्थ सहायक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी तर कृषि संचालक (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

प्रस्तूत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१२१४०९२४१६०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Arun Vishnupant Joshi

Digitally signed by Arun Vishnupant Joshi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=25b1cd893dfd4dc594def1c4642465ecdafbdae899f879d9b4603fe37cfb3598, cn=Arun Vishnupant Joshi
Date: 2018.03.12 14:11:18 +05'30'

(अ.वि.जोशी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई - ३२
२. मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
३. अपर मुख्य सचिव (कृषि) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२
४. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
५. संचालक (वि.प्र.), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
६. मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
७. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
८. सहाय्यक संचालक (लेखा), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१०. महालेखापाल, महाराष्ट्र -१/२, (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
११. वित्त विभाग (व्यय-१), मंत्रालय, मुंबई- ३२
१२. सह सचिव/उप सचिव (११-अे/२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक
१३. कक्ष अधिकारी (२- अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
१४. विभागीय व्यवस्थापक, भारतीय कृषि विमा कंपनी, स्टॉक एक्सचेंज टॉवर्स, २० वा मजला, दलाल स्ट्रीट,फोर्ट, मुंबई-४०० ०२३
१५. निवड नस्ती (कार्यासन ११-अे)